# 14 स्टोरीज दॅट इन्स्पायर्ड
# सत्यजित राय

**संकलन व इंग्रजी भाषांतर**
भास्कर चट्टोपाध्याय

**अनुवाद**
नीता गद्रे

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

14 Stories That Inspired Satyajit Ray Edited & Translated by Bhaskar Chattopadhyay
Marathi translation by Neeta Gadre
First published in English in India by Harper Perennial An imprint of HarperCollins Publishers
Copyright © Bhaskar Chattopadhyay 2014
First published in Marathi by Riya Publications in arrangement with HarperCollins Publishers India Limited

**14 स्टोरीज दॅट इन्स्पायर्ड सत्यजित राय :** भास्कर चट्टोपाध्याय

अनुवाद : नीता गद्रे

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**

नीता गद्रे
५०२, पराग वसंतलीला सोसायटी,
वाघबीळ नाक्याजवळ, घोडबंदर रोड,
ठाणे (वे)- ४००६१५, मो. नं. ९९३०३६८०२८

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ ३३०/-

## लेखकाचा परिचय

भास्कर चट्टोपाध्याय हे लेखक आणि अनुवादक आहेत. No child's Play (हार्पर कॉलिन्स पब्लिशर्स २०१३) आणि The house by the lake (शिक्षणविषयक अप्रकाशित) ही त्यांची भाषांतरे आहेत. ही दोन्ही पुस्तके ज्येष्ठ बंगाली लेखक शीर्षेन्दु मुखोपाध्याय यांनी लिहिलेली आहेत. भास्कर चट्टोपाध्याय संख्याशास्त्रज्ञ आणि एमबीए आहेत. त्यांनी कॉर्पोरेट क्षेत्रात यशस्वीपणे काम केलेलं आहे. त्यानंतर त्यांनी आर्टस्क्वेअर (www.artsquare.in) ही स्वत:ची कंपनी सुरू केली. ती भारतातली सर्वांत मोठी ऑनलाईन आर्ट गॅलरी आहे. ते आपली पत्नी श्वेता आणि मुलगा ईशान यांच्यासह बंगळुरू इथे राहतात. फावल्या वेळात त्यांना वाचनाची, लिहिण्याची आणि चित्रपट पाहण्याची आवड आहे. भास्कर यांची वेबसाईट आहे, bhaskar.chattopadhyay@gmail.com त्यावर त्यांच्याशी संपर्क साधता येईल.



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | देवी | .... ७ |
| २. | डरपोक माणसाची कथा | .... २२ |
| ३. | पाहुणा | .... ३४ |
| ४. | गुपी गातो, वाघा वाजवतो | .... ४९ |
| ५. | परीस | .... ६९ |
| ६. | प्रस्तावना | .... ८१ |
| ७. | बिरिंचीबाबा | .... १२२ |
| ८. | मणिमालिका | .... १४९ |
| ९. | पोस्टमास्तर | .... १६७ |
| १०. | शेवट | .... १७४ |
| ११. | बुद्धिबळाचे खेळाडू | .... १९७ |
| १२. | गाण्याचे दालन | .... २११ |
| १३. | पिकूची डायरी | .... २३८ |
| ✻ | भाषांतरकाराची टिपणी - भास्कर चट्टोपाध्याय | .... २४४ |
| ✻ | 'खेदाची बाब' - सत्यजित राय | .... २५० |
| ✻ | 'छबी विश्वास हा नैसर्गिक पर्याय होता' - सत्यजित राय | .... २५५ |
| ✻ | माझे देवीबाबतचे अनुभव - शर्मिला टागोर | .... २५८ |
| ✻ | अभिनेता धृतिमान चटर्जी यांची भास्कर चट्टोपाध्याय यांनी घेतलेली मुलाखत | .... २६३ |
| ✻ | अरुप के. डे. यांची भास्कर चट्टोपाध्याय यांनी घेतलेली मुलाखत | .... २६७ |


✦✦✦

**टीप :** मूळ इंग्रजी कथासंग्रहातील 'Deliverance' ही कथा काही कारणास्तव या अनुवादित संग्रहामध्ये समाविष्ट केलेली नाही, याची कृपया नोंद घ्यावी.



# देवी

*प्रभात कुमार मुखोपाध्याय*

फेब्रुवारी महिन्यातली लांबलचक रात्र, पहाट होण्याचं चिन्ह दिसत नव्हतं. उमाप्रसाद उठला. रजईखाली त्याने आपल्या बायकोला शोधलं, पण त्याला ती सापडली नाही. त्याच्या चाचपडत शोधणाऱ्या हाताला त्याची सोळा वर्षांची बायको सापडली. गादीच्या एका कोपऱ्यात रजईच्या उबेच्या बाहेर ती मुटकुळं करून पडली होती. तो हलकेच आपल्या झोपलेल्या बायकोजवळ गेला आणि त्यानं तिच्या अंगावर रजई पुन्हा नीट घातली. आपला हात लांब करून त्यानं तिच्या पायाकडं नेला आणि ते झाकले गेले आहेत ना याची खात्री केली.

उमाप्रसाद ऐन विशीत होता. त्यानं नुकतंच संस्कृतमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं होतं. आता त्याचं लक्ष पर्शियन भाषेकडे गेलं होतं. त्याची आई निवर्तली होती. त्याचे वडील प्रकांड पंडित होते आणि कालीमातेचे निस्सीम भक्त होते. ते त्या गावाचे प्रतिष्ठित जमीनदारही होते. उमाप्रसादचे वडील कालीकिंकर यांना साक्षात्कार झाला होता आणि कालीमातेनं स्वतः त्यांना आशीर्वाद दिला होता, अशी अनेकांची श्रद्धा होती. गावातला प्रत्येक माणूस मग तो कोणत्याही वयाचा असो! देवाबद्दल आदर बाळगावा तसा कालीकिंकरांबद्दल आदर बाळगत असे.

त्याचं लग्न होऊन तशी ५-६ वर्षं झाली होती, पण उमाप्रसाद अलीकडे अलीकडेच नव्या लग्नाच्या नशा आणणाऱ्या प्रणयाचा आनंद लुटत होता. अगदी अल्प काळापूर्वीच त्याला आपल्या बायकोच्या निकट सहवासाचा अनुभव मिळाला होता. तिचं नाव दयामयी होतं.

उमाप्रसादनं आपला हात हलकेच आपल्या बायकोच्या कमरेभोवती टाकला. त्याला जाणवलं की तिच्या कमरेजवळचा भाग गारठून गेलाय. त्यानं हलकेच काळजीपूर्वक तिच्या चेहऱ्याचं चुंबन घेतलं.

तिच्या श्वसनाच्या गतीमध्ये बदल झाला. उमाप्रसादला कळलं की त्याची बायको आता जागी झाली आहे. त्यानं मृदू आवाजात तिला हाक मारली. ''दया?''

दयानं लांबवलेल्या आणि प्रेमळ स्वरात विचारलं, ''काय?''

''तू जागी आहेस?''

दयानं आवंढा गिळत म्हटलं, ''नाही, मी झोपलेय.'' उमाप्रसादनं लाडानं आपल्या बायकोला छातीशी धरलं आणि म्हटलं, ''ओह! तू झोपलीयस तर! हो ना? मला आपलं आश्चर्य वाटलं की आता कुणी उत्तर दिलं?''

दयाला आपली चूक कळली. ती म्हणाली, ''मी आधी झोपलेलीच होते, आणि नंतर जागी झाले.''

उमाप्रसादनं थट्टेच्या स्वरात विचारलं, ''मग तू नक्की कधी जागी झालीस?''

''तुम्हाला केव्हा जागी झालेसं वाटतं? अगदी तेव्हाच.''

''नक्की कधी?''

''मला नाही माहीत.'' दयानं आपल्या पतीच्या उबदार मिठीतून बाहेर येण्याचा निष्फळ प्रयत्न करत म्हटलं.

थोड्या वेळापुरतं का होईना दयाच्या लाजाळूपणामुळं तिला ती नक्की केव्हा जागी झाली ते सांगता येईना. पण उमाप्रसादला इतर काही बहाणे नकोच होते. त्याला थेट उत्तर हवं होतं. काही क्षण गेले. तिनं उत्तर न देण्याचा हट्ट सोडला आणि म्हणाली, ''तेव्हाच. जेव्हा तुम्ही...''

आणि ती मध्येच थांबली.

''जेव्हा मी काय?''

''जेव्हा तुम्ही, माझं चुंबन घेतलंत. झालं समाधान?''

''उफ्...''

पहाटेचा मंद उजेड विखुरण्यासाठी अजून काही तास अद्यापही बाकी होते. ते जोडपं गप्पा मारायला लागलं. त्यातल्या बऱ्याचशा बोलण्याला काही अर्थ नव्हता. दोन प्रेमी जीवांमध्ये जसं संभाषण चालतं तसंच ते संभाषण होतं. अनेक शतकांपूर्वी आपल्या पूर्वजांचे पूर्वज त्यांच्या ऐन जवानीत, त्यांच्या प्रणयक्रीडेमध्ये जसे अस्वस्थ आणि अस्थिर होते तसेच आज आपण आहोत. ज्या कुटुंबाची मुळं धर्म आणि तत्त्वज्ञानामध्ये खोलवर रुजली आहेत, अशा कुटुंबातून आलेला

असूनही उमाप्रसादनं या दोन्हींपैकी एकाचाही उल्लेख आपल्या तरुण बायकोजवळ केला नव्हता.

तो गोड बाष्कळ प्रकार काही वेळ चालला, मग उमाप्रसाद म्हणाला, ''मी नोकरीसाठी पश्चिमेकडे जाणार आहे.''

दया म्हणाली, ''तुम्हाला नोकरी करायची गरजच काय? तुम्हांला कसलीच अडचण नाही. जमीनदाराच्या मुलानं नोकरी केल्याचं मी तर कधीच ऐकलेलं नाही.''

''मला प्रॉब्लेम आहे.''

''कसला?''

''तू जर माझे प्रश्न समजावून घेऊ शकत असतीस तर ते मुळात प्रश्न म्हणून उभे ठाकलेच नसते.''

दया गोंधळात पडली. तिनं विचार करण्याचा प्रयत्न केला. पण आपला नवरा कसल्या आणि कोणत्या अडचणीबद्दल बोलतोय हे तिला उमजेना.

दयानं खट्याळपणे विचारलं, ''तुमची बायको तुमच्या अपेक्षेप्रमाणे नाही या गोष्टीचा तुम्हांला त्रास होतोय का?''

आपला हा शेरा आपल्या नवऱ्याला पटणार नाही हे दयाला माहीत होते. तिच्या अपेक्षेप्रमाणेच उमाप्रसादनं तिच्या या प्रश्नाचा बदला घेण्यासाठी तिच्या चेहऱ्यावर चुंबनांचा वर्षाव केला.

''मला काळजी आहेच आणि ती तुझ्याबद्दलही आहे. मी दिवसभर तुला भेटू शकणार नाही. फक्त रात्रीच तुझ्याबरोबर असणं माझ्या दृष्टीनं पुरेसं नाही. मी माझं काम परदेशात घेईन जिथे दिवसा आणि रात्रीही फक्त तू आणि मी असू.''

''जर तुम्ही नोकरी पत्करलीत तर दिवसभर तुम्ही माझ्याबरोबर असाल अशी अपेक्षा कशी करता? मला घरात सोडून तुम्हांला कामावर जायलाच हवं.''

''मी कामावर जाईन, पण खरंच लवकर परत येईन.''

दयाला वाटलं, असं होऊ शकेल. पण त्या मार्गात खूप अडथळे होते.

''ते मला तुमच्याबरोबर जाऊ देणार नाहीत.''

''मी तुला इथून नेणारच नाहीये. तू जेव्हा तुझ्या आईवडिलांना भेटायला जाशील, तेव्हा मी येईन आणि आपण तिथून पळून जाऊ.''

दया हसली. ती कल्पना गमतीदार होती.

''आणि आपण तिथे किती वर्षं राहायचं?''

''खूप वर्षं''

दया हसत होती. पण तिला अचानक काहीतरी आठवलं.

''मला नाही वाटत की खोकापासून मी फार वर्षं दूर राहू शकेन.''

उमाप्रसादनं आपल्या बायकोच्या गालावर गाल टेकवला आणि तिच्या कानात तो कुजबुजला. ''मग तू स्वतःच एक खोका का नाही निर्माण करत?''

या बोलण्यामुळं दया लाजली; पण खोलीतल्या अंधाराचे आभारच मानले पाहिजेत. कारण ते लाजणं तिच्या नवऱ्यानं पाहिलं नाही.

खोका म्हणजे दुसरं तिसरं कुणी नसून उमाप्रसादच्या मोठ्या भावाचा – ताराप्रसादचा तो मुलगा होता. बरीच वर्षं घरात सर्वांत लहान उमाप्रसादच असल्यानं तो प्रत्येकाच्या प्रेमाचा धनी होता. लाडका होता. उमाप्रसाद मोठा झाल्यावर बराच काळ घरात कोणी लहान मूलच नव्हतं. त्यामुळं अर्थातच खोका हाच सर्वांचा 'आँखों का तारा' होता. खोकाच्या आईला – हरासुंदरीला आपल्या मुलाचा अभिमान वाटे.

दया म्हणाली, ''मला आश्चर्य वाटतंय. आज अजूनही खोका माझ्याकडं कसा आला नाही?''

भल्या सकाळी रोजच खोका त्याच्या प्रेमळ काकूकडे यायचा. तो त्याचा रोजचा नेम होता. घरात नोकराचाकरांची कसलीही कमी नव्हती, तरी बरीचशी दैनंदिन कामं दया स्वतःच करत असे. विशेषतः तिच्या सासऱ्यांच्या रोजच्या पूजेची आणि नैवेद्याची तयारी हमखास तिच्या अखत्यारीत असायची. पण दिवसभर इतकी कामात असूनही ती एक मिनिटही खोकाला नजरेआड होऊ देत नसे. खोकाही अंघोळीनंतर आपले ओले केस त्याच्या काकूखेरीज दुसऱ्या कुणालाही कोरडे करू देत नसे किंवा दुसऱ्याकडून डोळ्यांत काजळही घालून घेत नसे. त्याच्या काकूनं त्याच्या ओठांना दुधाचा ग्लास लावेपर्यंत तो दिलेलं दूध संपवायलाही नकार देत असे. रात्री उशिरापर्यंत त्याला झोपवण्यासाठी दयामयी त्याच्या खोलीत थांबत असे, पण भल्या पहाटे खोका जागा होत असे, आणि रडायला सुरुवात करत असे, आणि त्याच्या लाडक्या काकूकडे घेऊन जाण्याचा हट्ट करत असे. बहुतेक वेळा खोकाला त्याच्या आईकडून